**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – महेश लाडोबा शिरपुटे

माझे वय – ५२ वर्षे,

व्यवसाय – चालक

रा. – भरड मालवण, ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग

**<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती यु.आर.हेरवाडे यांचे मार्फत.</u>**

०१. दि. २४/०२/२०२१ रोजी पोलीसांनी मला कोठेही बोलविले नव्हते. मी कामासाठी कचेरीत आल्यानंतर मला सही करण्यासाठी सांगितले होते. त्यामुळे मी सही केली होती. पोलीसांनी माझ्यासमक्ष आरोपीकडून कुठलीही वस्तु जप्त केली नव्हती. मला आता जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी अ.क्र.१ ला माझी सही आहे. त्यातील मजकूर काय लिहिलेला आहे हे मला माहिती नाही.

**<u>साक्षीदार हा त्याच्या पूर्व जबाबाशी विसंगत साक्ष देत असल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली त्यानुसार सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.</u>**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि. २४/०२/२०२१ रोजी पोलीसांनी मला धुरीवाडा मालवण येथे जप्ती पंचनाम्यासाठी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर दिवशी पोलीसांनी आरोपीकडून माझ्या समक्ष काळया रंगाचा सॅमसंग जे–८ हा मोबाईल जप्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष आरोपीकडून मायक्रो व्ही–३१ हे मेमरी कार्डसुध्दा जप्त केले होते. हे म्हणणे खरे नाही की,सदरचा मुद्देमाल जप्् करुन पोलीसांनी माझ्या समक्ष जप्ती पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की,आरोपीने मला धमकाविलेले आहे त्यामुळे मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पूर्ण

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.आर.के.परुळेकर यांचे मार्फत.</u>**

आरोपीच्या विधीज्ञांनी उलट तपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : १०/०३/२०२५

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण